# स्थायी समिती सभा दिनांक १२.०२.२०१६ रोजीचे कार्यवृत्त

## (तहकुब सभा दि.१६.०१.२०१६)

## भाग-१

जिल्हा परिषद, स्थायी समिती सभा डॉ. पंजाबराव देशमुख सभागृह, जिल्हा परिषद, अमरावती येथे दि.१६.०१.२०१६ रोजी आयोजित करण्यात आली होती. परंतु कोरमपुर्ती अभावी ही सभा तहकुब करण्यात आली. त्यानंतर दिनांक दि.१६.०१.२०१६ रोजीची तहकुब सभा दि. १२.०२.२०१६ रोजी दुपारी ०१.०० वाजता डॉ. पंजाबराव देशमुख सभागृह, जिल्हा परिषद, अमरावती येथे आयोजित करण्यात आली. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, अमरावती यांनी सन्मा. उपाध्यक्ष श्री. सतीश हाडोळे, सन्मा. सभापती, बांधकाम व शिक्षण श्री. गिरीष कराळे, सन्मा. सभापती महिला व बाल कल्याण सौ. वृषालीताई विघे, सन्मा. सभापती कृषी व पशुसंवर्धन सौ. अरुणाताई गोरले, सन्मा. सभापती समाजकल्याण सौ. सरीताताई मकेश्वर तसेच सन्मा. स्थायी समिती सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी, सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), खाते प्रमुख व पत्रकार यांचे सभेच्या उपस्थिती निमित्ताने स्वागत केले व सचिव यांना सभा सुरु करण्यास अनुमती दिली.

**विषय क्रमांक १ :- दि. १८ डिसेंबर २०१५ (दिनांक २७ नोव्हेंबर २०१५ ची तहकुब सभा) रोजी संपन्न झालेल्या जि.प. स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त भाग-१ वाचुन कायम करणेबाबतच्या विषयावर सभागृहामध्ये खालीलप्रमाणे सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते मंजुरात प्रदान करण्यात आली.**

**मा.श्री. सुधीर सुर्यवंशी, सदस्य :-** मागील सभेत झालेल्या चर्चेप्रमाणे पाणी टंचाईची बैठक हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर पाणी टंचाईबाबत विशेष सर्वसाधारण सभा लावण्याची कार्यवाही करण्यात येईल असे रुलींग देण्यात आले होते. पाण्याची अडचण, टंचाई निर्माण झाली तर याला जबाबदार कोण? म्हणुन पाणी टंचाईच्या बैठकीबाबत काय झाले ते सांगावे?

**मा. अध्यक्ष :-** दिनांक २३ फेब्रुवारी २०१६ रोजी पाणी टंचाईबाबत विशेष सर्वसाधारण सभा लावण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**मा.श्री. अनिरुध्द उर्फ बबलुभाऊ देशमुख, सदस्य :-** राणामालुर येथील कामाबाबत संबंधित कंत्राटदारावर काय कारवाई करण्यात आली? गुणवत्ता नियंत्रण या कार्यालयाच्या अहवालाचा उल्लेख का नाही ते सांगावे?

**मा.सभापती (शिक्षण व बांधकाम) :-** अधिक्षक अभियंता, गुणवत्ता नियंत्रण यांच्या अहवाल आला असुन त्यांच्या अहवालात काम निकृष्ट असल्याचे नमूद आहे. म्हणुन गुणवत्ता नियंत्रण या कार्यालयाच्या अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**मा.मु.का.अ. :-** प्रकरणी सभागृहात पारित ठरावाचे अनुषंगाने संबंधीत कंत्राटदारास काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

**मा.श्री. अभिजीत ढेपे, सदस्य :-** मा.मु.का.अ. यांनी सभागृहात झालेल्या ठरावा प्रमाणे कार्यवाही केली म्हणुन त्यांचे मी आभार मानतो. परंतु माझा या ठरावाला विरोध आहे.

**विषय क्रमांक २ :- शासनाकडुन प्राप्त परिपत्रकांचे वाचन करणे.**

**मु.ले.वि.अ. :-** तेराव्या वित्त आयोगाचा आयोगाचा अखर्चित निधी खर्च करण्यास मुदतवाढ मिळणेबाबतच्या ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण- २०१५/(३३४/१५)-एस.डी.४, दि. २२ जानेवारी, २०१६ चे सभागृहात वाचन करण्यात आले.

**मा.श्री. अभिजीत ढेपे, सदस्य :-** ३१.३.१६ पर्यंत मुदतवाढ मिळाल्यामुळे अधिकारी/कर्मचारी काम करणार नाहीत. याबाबत प्रशासन उदासिन आहे. अधिकारी/कर्मचारी यांची काम करण्याची मानसिकता नाही.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदगांव खंडेश्वर यांना भेटलो तरी ते कामे करीत नाहीत, हे बरोबर नाही.

**ग.वि.अ.पं.स. नांदगांव (खं) :-** येनस ग्रामपंचायतबाबत मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. मार्गदर्शन प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल. संबंधित उप अभियंता यांना तशा सुचना देण्यात आल्या आहेत.

**मा.श्री. अभिजीत ढेपे, सदस्य :-** मुल्यांकन करु शकत नाही म्हणुन प्रशासनाने संबंधित ग्रामपंचायतला लेखी द्यावे.

**मा.श्री. अनिरुध्द उर्फ बबलुभाऊ देशमुख, सदस्य :-** याबाबत चौकशी करण्यात यावी व चौकशीदरम्यान कोणावरही अन्याय होणार नाही याची काळजी घ्यावी. चौकशी करुन पुढील सभेत अहवाल ठेवण्यात यावा.

**मा.श्री. अभिजीत ढेपे, सदस्य :-** चौकशी पुर्ण होईपर्यंत मुल्यांकन करु शकत नाही म्हणुन प्रशासनाने संबंधित ग्रामपंचायतला लेखी द्यावे.

**मा. अध्यक्ष :-** सन्मा.सदस्य श्री. अभिजीतभाऊ ढेपे यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत म्हणजे येनस ग्रामपंचायतबाबत चौकशी करुन पुढील सभेत अहवाल ठेवावा.

**शि.अ.(प्राथ.) :-** फटाक्यांच्या दुष्परीणामांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती करणेबाबतचा शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण- २०१५/(३३४/१५)-एस.डी.४, दि. २२ जानेवारी, २०१६ चे सभागृहात वाचन करण्यात आले.

**शि.अ.(प्राथ.) :-** केंद्र शासनाच्या मध्यान्ह भोजन योजना (शालेय पोषण आहार) नियमावली २०१५ च्या अंमलबजावणीबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई शासन परिपत्रक क्रमांक : शापोआ-२०१५/प्र.क्र.२२२/एस.डी.३, दि. ०२ फेब्रुवारी, २०१६ चे सभागृहात वाचन करण्यात आले.

**सचिव :-** ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्तेवारील कर आकारणीस देण्यात आलेली स्थगिती उठविण्याबाबत ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई शासन परिपत्रक क्रमांक : पीआयएल- २६१४/प्र.क्र.३३९/पं.रा.४ दि. ०२ जानेवारी, २०१६ चे सभागृहात वाचन करण्यात आले.

**<u>सचिव</u> :-** उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) या कार्यालयाच्या सक्षमीकरणाबाबत ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई शासन निर्णय क्रमांक : मविसे- १०/२०१५/प्र.क्र.१६४/आस्था-३(अ) दि. ११ फेब्रुवारी, २०१६ चे सभागृहात वाचन करण्यात आले.

**<u>मा. सभापती स्थायी समिती यांचे परवानगीने येणारे वेळेवरील विषय</u>**

**<u>विषय क्रमांक</u> ३ :- वैराट व चुर्णी, ता. चिखलदरा येथील व्याघ्र प्रकल्पामुळे विस्तापित झालेल्या कुटुंबाचे पुनर्वसन केलेल्या ग्रामपंचायत घाटलाडकी ता. चांदुर बाजार अंतर्गत येणारी वस्ती पुनर्वसन (लक्ष्मीनगर) नावाने नविन ग्रामपंचायत स्थापन करणेबाबतच्या विषयाला सभागृहात सर्वानुमते मंजुरात प्रदान करण्यात आली.**

**<u>विषय क्रमांक</u> ४ :- ३०५४ २०१६ जिल्हा वार्षिक योजना सन २०१४-१५ (गैरआदीवासी) मार्ग व पुल परिरक्षण कार्यक्रम अंतर्गत असलेल्या खेलापूर नावेड रस्त्याच्या कामाचे निविदा स्विकृतीस जि.प.स्थयी समिती सभेची मान्यता मिळणेबाबतच्या विषयावर खालील प्रमाणे चर्चा होवून मंजुरात प्रदान करण्यात आली.**

**<u>मा.श्री. सुधीर सुर्यवंशी, सदस्य</u> :-** आजची सही सभा तहकुब सभा असल्यामुळे या सभेत वेळेवरील विषय घेतात येतात काय याबाबत प्रशासनाने मत द्यावे.

**<u>सचिव</u> :-** आजची सही सभा तहकुब सभा असल्यामुळे या सभेत वेळेवरील विषय घेता येत नाहीत. परंतु नोटसीटवर वेळेवरील विषय आलेले आहेत.

**<u>मा.श्री. रविंद्र मुंदे, सदस्य</u> :-** आजची सही सभा तहकुब सभा असली तरी त्यावेळी वेळेवरील विषय आले होते. तसेच जे वेळेवरील विषय आहेत ते फार महत्वाचे आहेत. हा जर खर्च झाला नाही तर तालुक्याचे नुकसान होईल. मार्चपर्यंत खर्च होणे आवश्यक आहे. तसेच ही कमी दराने निविदा आहे. यामध्ये आपल्या जिल्हा परिषदेचा फायदा आहे.

**<u>मा.श्री. अभिजीत ढेपे, सदस्य</u> :-** सन्मा. सदस्य श्री. रविंद्रभाऊ मुंदे यांना विकासाची तळमळ आहे. म्हणुन वेळेवरील विषय आजच्या सभेत घेता येतात काय? याबाबत प्रशासनाने मत द्यावे. तसेच नियमात बसत नसेल तरी वेळेवरील विषय आजच्या सभेत घेतले तर याचा परिणाम काय होऊ शकतो. याबाबत सुध्दा प्रशासनाने मत द्यावे.

**<u>मा.श्री. सुधीर सुर्यवंशी, सदस्य</u> :-** ज्या दिवशी ही सभा तहकुब झाली त्या दिवशी सभागृहात कोणतेही सन्मा. सदस्य उपस्थितीत नव्हते.

**<u>मा.श्री. रविंद्र मुंदे, सदस्य</u> :-** सभेची नोटीसची प्रक्रिया होत असतांनी मा. अध्यक्ष यांचेकडे नोटसीटवर विषय आला असेल तर घेता येईल. कारण नोटीस निघाल्यानंतर काही महत्वाचे विषय येतात व त्या विषयांना मा.अध्यक्ष महोदय वेळेवरिल विषय म्हणुन घेण्यास परवानगी देतात त्यामुळे हा विषय मागील सभेलाच वेळेवरील विषय असल्याने मंजुर करण्यात यावा.तसेच निधी अखर्चित राहु नये, जिल्हा परिषद अडचणीत येऊ नये. तसेच यापुर्वी झालेल्या सभेत वेळेवरील विषय घेण्यात आले त्याप्रमाणे आजही कार्यवाही करण्यात यावी.